**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 385 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 23 / 10 / 2024

---

# 1)अवैध रेती चोरी :-

**वजिराबाद** :- दिनांक 22.10.2024 रोजी 12.40 वा. चे सुमारास, **गोवर्धन घाट ब्रिज दिलीपसिंग कॉलनी, मध्ये जाणारे रोडवर बॉबी महाराज यांचे घरासमोर, नांदेड येथे,** यातील आरोपी नामे समाधान बाबासाहेब जाधव, वय 30 वर्षे व्यवसाय चालक रा. गोवर्धन घाट नांदेड यांने बिना परवाना बेकायदेशिररीत्या अर्धा ब्रास काळी रेती व एक टाटा कंपनीची 407 मॉडेल टेम्पो क्रमांक एम.एच.-02/एक्स.ए.-2649 एकुण किंमती 2,03,000/-रूपयाचा मध्ये रॉयल्टी न घेता रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी परि पोउपनि/श्री वचिष्ठ आश्रोबा विक्कड, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 517/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता-2023 सह महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम कलम 48(7),48(8) कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/412 कानगुलवार, मो.क्रं. 8329585283** हे करीत आहेत.

# 2)गंभीर दुखापत :-

**रामतीर्थ** :-दिनांक 17.10.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **गागलेगाव महाकाली मंदिर जवळ ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील 1. शंकर नामदेव हुस्केवाड व इतर तिन आरोपीतांनी संगणमत करून शेतात झालेल्या भांडण्याच्या कारणावरून व धुऱ्यावर गवत टाकण्याच्या कारणावरून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले व फिर्यादीचा डावा हात फॅक्चर केले तसेच साक्षीदार यांना काठीने पाठीत, मांडीवर मारहाण केली इतरांना थापडा बुक्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी नामदेव दिगंबर चिंचवड, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. गागलेगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 262/2024 कलम 118(2),118(1), 352,3(5),351(2),3 भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शेख, मो.नं. 9823206916** हे करीत आहेत.

# 3)विश्वासघात :-

**विमानतळ** :- दिनांक 01.01.2024 ते दिनांक 16.08.2024 रोजी दरम्यान, **भारत फायनान्शीयल इन्क्ल्युजन लिमीटेड शाखा कार्यालय, पांडुरंगनगर, नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. साहेबराव संभाजी नरवाडे वय 25 वर्षे रा. कांकठी ता. बिलोली जि. नांदेड 2. प्रशांत प्रकाश पतंगे वय 25 वर्षे रा. अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड यांनी कंपनीच्या कर्जदार सदस्यांकडून कलेक्शनच्या हप्त्याची रक्कम एकुण 6,04,077/-रूपये वसुल करून ती ऑफिसला आणुन भरणे असे आरोपीतांचे काम होते पण आरोपीतांनी कलेक्शनची रक्कम कंपनी कार्यालयात रोखपाल यांच्याकडे जमा केली नाही वारंवार फोन करून पैसे भरणे बाबत कळविले असता पैसे न भरता स्वतःकडे आज रोजी पर्यंत परस्पर जवळ घेवुन ठेवून विश्वासघात केला. वगैरे **फिर्यादी अमोल भाऊ पवार, वय 34 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. भास्करनगर सोसायटी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 431/2024 कलम 316(5),3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2191 चिंतोरे, मो.नं. 9552501857** हे करीत आहेत.

# 4)जुगार :-

**मुखेड** :- दिनांक 22.10.2024 रोजी 15.40 वा. चे सुमारास, **मुखेड येथे बसस्थानक समोर रोडवर मुखेड, ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे संजय गोविंदराव यरमूनवाड वय 42 वर्षे व्यवसाय मुजरी रा. वाल्मिकनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड यांने विना परवाना बेकायदेशिररीत्या कल्याण नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1360/-रूपये व मोबाईल किंमती 9000/-रूपयाचा असा एकुण 10,360/-रूपयाचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/मन्मथ बालाजी गौंड, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे मुखेड** गुरनं 336/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो. नं. 8390695468** हे करीत आहेत.

## 5)गळफास घेवुन आत्महत्या :–

**मनाठा :–**दिनांक 22.10.2024 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **मयताचे शेतात रावणगाव शिवार ता. हदगाव जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे अंकुश आनंदराव करनूर, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. पांगरी ता. हदगाव जि. नांदेड**, यांनी नापिकीला व वडीलावरील बॅंकचे कर्ज फेडू शकत नसल्यामुळे शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार किशन बाबुराव करनूर, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. पांगरी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मनाठा** आ. मृ. **18**/2024 कलम 194 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2334 यादव, मो.नं. 8830666758** हे करीत आहेत.

## 6)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**माळाकोळी :–**दिनांक 22.10.2024 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **मयताचे शेतात मौजे हाडोळी ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे विशाल डीगांबर लोनचिरे, वय 29 वर्षे, रा. हाडोळी ता. लोहा जि. नांदेड** हा शेतात विद्युत मोटार चालू करण्यासाठी गेला असता त्यास विद्युत शॉक लागून उपचार दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार डॉ. शितल पानझडे, वैदयकिय अधिकारी स.द. लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. **25**/2024 कलम 194 भारतीय न्याय संहीता–2023 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2308 राठोड, मो.नं. 9284536640** हे करीत आहेत.


जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 386 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 23 / 10 / 2024

---

# प्रेसनोट

**सर्व ग्रुप ॲडमिन व सभासद समाजमाध्यम (सोशल मिडीया) यांना नांदेड पोलीस विभागाकडुन आवाहन करण्यात येते की,** ज्याअर्थी आपले गावात शहरात सोशल मिडीया माध्यमातुन एकमेकांशी संवाद साधत आहात. विधानसभा सार्वत्रिक निवडणुका –2024 चे अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्रभर दिनांक 15.10.2024 रोजी पासुन आदर्श आचारसंहिता लागू असून निवडणुक प्रक्रिया व मतमोजणी प्रक्रिया होणार असून दरम्यान मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे आदेशान्वये नांदेड जिल्हास्थळ सिमेच्या हद्दीमध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम अन्वये 37(1)(3) चे प्रतिबंधक आदेश तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता–2023 चे कलम 163 अन्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

त्याअर्थी मतदान प्रक्रिया व प्रचारादरम्यान आपणास खालीलपैकी कोणतेही गैरकृत्य परावृत्त होणेकरीता खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

1) कोणत्याही उमेदवाराशी संबंधित त्याचे वैयक्तीक, कौटुंबिक अगर सामजिक स्तरावर अवहेलना होईल असे आक्षेपार्ह टिकाटिपण्णी करणे मजकुर फोटो, व्हिडीओ, (एडिट मार्फिंग) करून प्रसारीत करणे अथवा आलेल्या संदेशावर आपले आक्षेपार्ह मत प्रकट करणे व पुढे पाठविणे.

2) मतदाराचे मन वळविण्यासाठी कोणत्याही धर्माच्या लोकांच्या धार्मिक भाषिक तसेच जातीत व्देष पसरविणारे आक्षेपार्ह मजकूर फोटो, व्हिडीओ, (एडिट मार्फिंग) करून प्रसारीत करणे.

3) निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल अशा प्रकारचे स्वतंत्र सोशल मिडीया ग्रुप तयार करून त्याव्दारे आक्षेपार्ह मजकूर फोटा, व्हिडीओ, (एडिट मार्फिंग) करून प्रसारीत करणे अथवा कृत्य करणे.

4) कुठल्याही व्हॉटसअप ग्रुपमध्ये आचारसंहितेचा भंग होईल अथवा दोन गटात वाद होईल अशी पोस्ट अथवा मजकूर फोटो, व्हिडीओ टाकल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्तीसह ग्रुप ॲडमीन जबाबदार असणार आहे.

वरील सुचनांचे पालन करणे हे आपल्याला बंधनकारक राहिल आपलेकडून आदर्श आचारसंहिता भंग झाल्यास आपणास जबाबदार धरण्यात येऊन आपले विरूध्द कडक कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड